Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 693 – 699

DOI: 10.5281/zenodo.10279238

**Original Research Article**

# महात्मा गांधी यांचे शिक्षण व्यवसाय विषयी विचार: काल, आज, आणि उद्या

नादरगे चंद्रदीप बालाजी

श्री पांडुरंग विद्यालय, कल्लूर, ता. उदगीर जि. लातूर, महाराष्ट्र

*Corresponding author E-mail*: chandardeepnadarge743@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधी यांचे योगदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण व मोलाचे आहे. स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधीजींच्या भूमिकेत सत्याग्रह आणि जनआंदोलनाचा समावेश होतो. त्यांनी 1917 मध्ये चंपारण सत्याग्रह, 1918 मध्ये खेडा सत्याग्रह, 1918 मध्ये अहमदाबाद मिल संप, 1920 मध्ये असहकार आंदोलनाचे नेतृत्व केले. 1920 नंतर भारतीय लढ्याचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे आले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा व महात्मा गांधीजींच्या कार्याभोवती केंद्रीय झाला. महात्मा गांधी यांचे नाव जगभर पसरलेले आपल्याला दिसते त्यांचे कारण म्हणजे त्यांनी भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा उमटवलेला ठसा होय. महात्मा गांधी यांनी खूप मोठे योगदान शिक्षण क्षेत्राला दिले आहे. या संदर्भात मी माझे विचार मांडणार आहे. त्यांचे शिक्षणाबद्दलचे विचार असे होते की, शिक्षणाचा अर्थ त्यांनी मूलभूत अशा संकल्पनेवर आधारित केलेला आहे. "शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास होय." "शिक्षण म्हणजे मन, आत्मा, बुद्धी यांचा विकास होय." "शिक्षण म्हणजे बुद्धीला ज्ञानाकडे, शक्तीला श्रमाकडे व भावनेला प्रेमाकडे नेणे म्हणजे शिक्षण" अशी त्यांनी शिक्षणाची व्याख्या केलेली आहे. शिक्षणाची ध्येय त्यांनी अशी मांडली आहेत चारित्र्य निर्मिती करणे, सर्वांगीण विकास करणे ही होय. सांस्कृतिक शिक्षण विद्यार्थ्यांना देणे त्यांच्याबरोबर शारीरिक शिक्षण, पारंपारिक पद्धतीचे, चित्रकला, हस्तकला, क्रीडा यांचे शिक्षण देणे. निसर्गातून शिक्षण देणे जेणेकरून विद्यार्थ्यांना ते सोपे जाईल त्याबरोबर ललित कला, कृती द्वारा शिक्षण देणे,धार्मिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, स्वानुभवातून शिक्षण, समन्वयातून शिक्षण अशा विविध संकल्पनेवर त्यांनी त्या काळात प्रभाव टाकला होता. हे त्यांचे शैक्षणिक विचार काल, आज आणि उद्याही टिकतील असेच आहेत.

**उद्दिष्ट्य**

१. महात्मा गांधीजींच्या कार्याचा व शिक्षण विषयक कार्याचा अभ्यास करणे.

२. महात्मा गांधी यांच्या शिक्षणाची उद्दिष्टे समजून घेणे व अभ्यासणे.

३. महात्मा गांधीजींच्या स्त्री शिक्षण विषयक विचारावर प्रकाश टाकणे.

४. महात्मा गांधीजीचे शैक्षणिक विचार काल, आज, उदया या दूरदृष्टी विचार प्रभावाचा परामर्श होणे.

५. प्रौढ व बालशिक्षण या विषयाची भूमिका स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. तसेच शोधनिबंधाच्या संदर्भात तथ्य संकलनासाठी मासिके, विविध संशोधन पर लेख, पुस्तके यासारख्या दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे.

**अभ्युपगम**

१. ग्रामीण भागातही लघु उद्योगाला चालना मिळाली पाहिजे. त्यामुळे अनेक लघु उद्योगात वाढ झाली पाहिजे.त्यातून कुशल कारागीर निर्माण झाले पाहिजेत.

२. हस्तकला, चित्रकला, स्वच्छता, आरोग्य, सवलंबन, शारीरिक श्रम,अशा पारंपारिक शिक्षण पद्धतीतून विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळाला पाहिजे.

३. गरिबांची मुले ही मोफत शिक्षणातून व्यवसायभिमुक बनले पाहिजेत.

४. नुसते पुस्तकी ज्ञान नको, तर त्या ज्ञानाचा उपयोग जीवनात करता आला पाहिजे. आणि त्यातून जीवन सुखकर बनले पाहिजे त्यातूनच देशाचा विकास साधता आला पाहिजे.

५. बेरोजगारी, गरिबी, भ्रष्टाचार या समस्या नष्ट करण्यासाठी स्वावलंबी समुदायाची निर्मिती झाली पाहिजे.

**महात्मा गांधी व शिक्षण विचार**

महात्मा गांधी यांनी 1937 मध्ये वर्धा येथे झालेल्या शैक्षणिक परिषदेत आपले शिक्षण विषयक विचार मांडले आहेत. महात्मा गांधी यांची शिक्षण पद्धती ही वर्धा योजना, मूलदयोगी शिक्षण, बुनियादी शिक्षण, व जीवन शिक्षण इत्यादी नावाने ओळखले जाते. महात्मा गांधीजी म्हणतात की मी शिक्षण क्षेत्रात अनाधिकारी व्यक्ती आहे व शिक्षणाचा जो रूढ व तांत्रिक अर्थ आहे त्यापासून मी अनभिज्ञ आहे.पण हा त्यांचा नम्रपणा होता कारण ते स्वतः म्हटले आहे मी भारताला अनेक प्रकारच्या गोष्टी दिल्या त्यात वर्धा शिक्षण योजना व शिक्षण पद्धती ही सर्वात महत्त्वाची आहे. त्यांच्या शिक्षण विषयक तत्त्वज्ञानात निसर्गवाद, अर्थ वाद, वास्तववाद व कार्यवाह या चारही तत्त्वाचा समन्वय झालेला दिसून येतो. गांधीजींनी समाज शिक्षण, प्रौढ शिक्षण, स्त्री व हरिजन शिक्षण, विद्यापीठ शिक्षण इत्यादी घटकात महत्वपूर्ण कार्य केले आहे. गांधीजींच्या मते शिक्षण हे फक्त पुस्तकी शिक्षण नको तर शिक्षणामुळे बुद्धी, शरीर, हृदय या तिन्हीचा समतोल विकास साधता आला पाहिजे. म्हणजेच आजच्या वर्तमानात शिक्षण प्रणालीचा ढासाळलेला दर्जा हा महात्मा

गांधीजींच्या शिक्षण विषयक विचाराने निश्चितच उंचावल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी गांधीजींच्या विचाराचा अवलंब करणे आजही आवश्यक ठरते.

**ब्रिटिश राजवट**

भारतात ब्रिटिश वसाहती राजवटीच्या आगमनाने साम्राज्यवादी शिक्षणाची एक परदेशी प्रणाली सुरू करण्यात आली. जी भारताच्या जुन्या सर्वसामावेशक शैक्षणिक प्रणालीच्या विरुद्ध होती. यामुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेचे दीर्घकाळात कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. शिवाय सर्व प्रकारचे भेद वर्ण जाणिवा, पाश्चात्य भौतिकवादी जीवनशैलीची सतत वाढत जाणारी लालसा इत्यादींची संख्या निर्माण झाली आहे. गांधीजींचे बहुतेक महत्त्वाचे लेखन हे शिक्षणावर झाले आहे. त्यांनी दोन पुस्तकात फक्त शिक्षणावरच आपले विचार मांडले आहेत.

**स्वछता**

गांधीजींनी सर्वाना आवर्जून सांगितले की, त्यांच्या प्राथमिक शिक्षणाच्या योजनेत स्वच्छता, पोषण ही प्राथमिक तत्वे आहेत. याशिवाय संगीत कवायतीद्वारे सक्तीचे शारीरिक प्रशिक्षण समाविष्ट असेल. गांधीजीचे म्हणणे आहे की त्यांची योजना विद्यार्थ्यांना मजबूत बनवेल आणि त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करेल. त्यांच्या पालकांसाठी आणि त्यांच्यासाठी हे शिक्षण खूप उपयुक्त ठरेल. शरीर स्वच्छता, शाळेची स्वच्छता, परिसराची स्वच्छता यांचा अभ्यासक्रमात समावेश असलाच पाहिजे. यावर गांधीजी ठाम होते. श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी आश्रमातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना काही कष्टाची कामे करावी लागतअसत. हा गांधीजींच्या मूल्य शिक्षणाचा एक भाग होता. गांधीजी स्वतः शारीरिक कष्टाचे कामे करीत असत. त्यांनी श्रमाला फार मोठे महत्त्व दिले आहे.जेणेकरून त्यांचा असा विचार होता की प्रत्येक विद्यार्थी शारीरिक दृष्ट्या हातबल होणार नाही हा देखील गांधीजीच्या मूल्य शिक्षणाचा एक भाग होता.

**श्रमाची जाणीव**

गांधीजींना कधीच इतरांवर अवलंबून राहावे लागले नाही आपण स्वतः कष्ट केले तर विद्यार्थ्यांना आपल्यापासून प्रेरणा मिळेल म्हणून त्यांनी स्वतःच्या आयुष्यात शारीरिक श्रमाला खूप महत्त्व दिले आहे. शारीरिक श्रमाबरोबर नैतिक विकास किंवा चारित्र्य विकास होणे हे गरजेचे आहे असे त्यांना वाटत होते. या विकासावरून शिक्षणाचे महत्त्व आहे हे खूप महत्वाचे असे उद्दिष्ट आहे असा त्यांचा विश्वास होता. गांधीजीं असे मानत होती की प्रत्येक कामामध्ये एक ईश्वर आहे. प्रत्येक आत्मा हा देवरूप आहे. म्हणून प्रत्येक मुलाने आपल्यातील ईश्वर भक्तीची जाणीव करून एक दैवी मानव बनले पाहिजे असे त्यांना वाटत होते. गांधीजी आपल्याबरोबर समाजाला घेऊन चालणारे, विद्यार्थ्याबद्दल त्यांचे असे मत होते की विद्यार्थ्यांनी सदैव विनम्र असले पाहिजे. ते नेहमी म्हणायचे महान राहण्यासाठी सुद्धा कमी राहिलो तरी चालेल पण गरिबांच्या मुलांसाठी त्यांनी मोफत शिक्षणाची सोय केली. विद्यार्थ्यांना नुसते पुस्तक की ज्ञान नको तर शिक्षणातून शिक्षण पद्धत अशी असली पाहिजे की जे व्यक्तीला चांगलं काय आणि वाईट काय यांचे ज्ञान प्राप्त झाले पाहिजे. त्यांना नैतिक बनविण्यासाठी प्रेरणा मिळाली पाहिजे. गांधीजी शिक्षणाला मानवाच्या सर्वांगीण विकासाचा पण सशक्त पाया मानत होते.

**जीवन मूल्य**

'स्व' म्हणजे स्वतः विद्यार्थ्याला स्वतःची जाणीव असणे व त्या अनुषंगाने तो विद्यार्थी वडीलधाऱ्यासोबत वागणे म्हणजेच 'स्व' ची जाणीव होय. इतरांच्या संकटाला आपले संकट समजून त्याचे दुःख जाणून घेणे म्हणजेच समानानुभूती होय.समस्या समजून घेऊन त्या समस्येला न घाबरता तोंड देणे व ती समस्या सोडवणे म्हणजेच समस्या निराकरण होय . ज्ञानानुसार तो विद्यार्थी त्या समस्येचे निराकरण करतो. एखादया समस्येतून बाहेर पडण्यासाठी चटकन निर्णय घेणे म्हणजेच निर्णयक्षमता होय.स्वतःच्या विचाराने एखादी माहिती पटवून देणे आणि गैरसमज दूर करणे म्हणजे परिणामकारक संप्रेषण होय. व्यक्तिमध्ये किंवा मित्रामध्ये वागताना सहकार्याची भावना बाळगणे त्यामुळेच त्याच्यात ते आपल्यात कायमचे संबंध टिकून राहतात .आपल्या स्वतःच्या विचारातुन अप्रतिम कलाकृती निर्माण करणे म्हणजेच सृजनशील विचार होय. एखादी गोष्टीविषयी परीक्षण करणे व त्या अनुषंगाने जास्तीत जास्त माहिती मिळवणे म्हणजे चिकित्सक विचार होय. इतरांच्या भावना समजून घेणे, परिस्थितीशी तोड़ देऊन जगणे म्हणजेच भावनांचे समायोजन होय. वेळापत्रकानुसार काम करण्याची सवय असल्यास त्या कामाचा ताणतणाव वाढत नाही.म्हणून मला म्हणावेसे वाटते महात्मा गांधीजींचे हे विचार काल, आज आणि आणि उद्या चिरंतर टिकणारेच आहेत.

**संस्काराची रुजवण**

मुले शाळेत सर्वच गोष्टी शिक्षकाकडून शिकतात असे नाही तर इतर मुलाकडूनही काही चांगल्या वाईट गोष्टी शिकतात. संगतीतून वाईट गोष्टी त्यांच्यात रुजल्या जातात अशा विद्यार्थ्यांकडे लक्ष देऊन त्यांच्यात संस्काराची रुजवून केली पाहिजे तरच विद्यार्थी सुसंस्कृत बनतील याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे असेही गांधीजींनी आपले मत स्पष्ट केले आहे.

**बालशिक्षण आणि गांधीजी**

वयाच्या सात ते 14 वर्षापर्यंत प्रत्येक मुलांचे शिक्षण मोफत सक्तीचे असले पाहिजे. शिक्षणाचे माध्यम मातृभाषेतच असावे. केवळ साक्षरता ही शिक्षणाची बरोबरी करता येणार नाही. शिक्षणाने शिक्षणाचे माध्यम म्हणून काही हस्तकलेचा वापर केला पाहिजे. जेणेकरून मुलांना त्यांच्या जीवनासाठी आर्थिक स्वावलंबन मिळेल. आनंदी शिक्षणातून मुलांना शाळेविषयी आवड प्रेम निर्माण होईल. शिक्षणाने मुलांमध्ये मानवी मूल्ये रुजवली पाहिजे. शिक्षणातुन उपयुक्त आणि जबाबदार नागरिक घडले पाहिजेत. शिक्षनाणे मुलाच्या सर्व लपलेल्या सुपृत कलागुणांना वाव मिळाला पाहिजे. त्याचबरोबर तोंडी ज्ञानामुळे त्याचे व्यवहारिक ज्ञान वाढविणे गरजेचे आहे.लहान वयापासूनच हस्ताक्षर चांगले असले पाहिजे.हा आग्रह गांधीजींचा होता लहान मुलांचे शिक्षण ही स्त्रिया चांगल्या प्रकारे करू शकतात असेही गांधीजी मत मांडतात. बाल शिक्षणात धार्मिक शिक्षण देण्याचाही आग्रह गांधीजी करतात. गांधीजींचे शिक्षण विषयक विचार हे सर्वोतोपरी विकासाच्या दिशेने नेणारेच आहे. सर्व शिक्षण हे कुठल्यातरी उत्पादक हस्तकलेतून किंवा उद्योगातून दिले जावे आणि त्या उद्योगाशी उपयुक्त संबंध प्रस्थापित व्हावा. उद्योग असा असावा की मुलाला व्यवहारिक कामातून फायदेशीर कामाचा अनुभव मिळू शकेल.शिक्षणामुळे विद्यार्थी स्वावलंबी बनले पाहिजे.आर्थिक स्वावलंबन आणि

उपजीविकेसाठी स्वावलंबन शिक्षणातून व्हायला हवे. अशाप्रकारे गांधीजींच्या शैक्षणिक विचारांमध्ये केवळ साक्षरता किंवा विविध विषयाचे ज्ञान यापेक्षा बालकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास अधिक महत्त्वाचा आहे.

**गांधीजींचे स्वावलंबन**

गांधीजींच्या मते शिक्षणाच्या माध्यमातून एखाद्या मुलाने काही उद्योग किंवा व्यवसाय स्वीकारून त्याच्या भविष्यातील जीवनाच्या गरजा त्याला पूर्ण करता आल्या पाहिजेत. त्यासाठी उत्पादक कला शिकण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी स्वावलंबन आणि उपजीविका मिळविण्याची क्षमता हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणून शिक्षणाचा पुरस्कार केला पाहिजे. परंतु प्रत्येक मुलाने शिकण्यात गुंतून कमावले पाहिजे आणि कमाई करण्यात व्यस्त असल्याने काही शिकले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. व्यावसायिक शिक्षणासोबत सांस्कृतिक प्रगती ही साधली पाहिजे असे मत त्यांनी मांडले. महात्मा गांधींनी प्रस्तावित केलेल्या शिक्षण पद्धतीला मूलभूत शिक्षण असे म्हणतात. त्यांनी मुख्यत्वे मुलाला कुशल आणि स्वावलंबी बनविण्यासाठी मूलकेंद्रित शिक्षण देण्यास सांगितले. गांधीजींना छोट्या स्वावलंबी समुदायांची निर्मिती करायची होती. ज्याच्या आदर्श नागरिक सर्वच कष्टाळू, स्वाभिमानी समुदयात राहणारे असे होते. मुलांसाठी काही हस्तकला शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे यामुळे बेरोजगारी, गरिबी, भ्रष्टाचार आणि इतर अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि स्वावलंबनाचे धडे गिरविण्यासाठी हे शिक्षण उपयुक्त आहे. गांधीजी व्यवहारवादी शिक्षण तज्ञ होते, शिक्षणाने स्वतःचा विकास साधून स्वतःची भाकर मिळविता आली पाहिजे. व्यक्तीला शिक्षणामुळे भावी आधार मिळाला पाहिजे. शिक्षणामुळे स्वावलंबी बनून स्वतःची प्रगती साधता आली पाहिजे. हा मुख्य हेतू शिक्षणाचा असावा असे गांधीजी मत मांडतात. त्यांचे हे विचार काल, आज आणि उदयाही अस्तित्वात राहणारेच आहेत.

**स्त्री शिक्षण**

स्त्रियांनी ग्रह व्यवस्था, मुलांना सांभाळणे, स्वच्छता राखणे, स्वयंपाक घरात काम करणे, या कामाव्यतिरिक्त इतर विषयाची ही स्त्रीयांना शिक्षण दिले पाहिजे. स्त्री व पुरुष यांचा दर्जा समान आहे त्यासाठी स्त्री शिक्षणाच्या वेगवेगळया प्रभावी योजना आखल्या पाहिजेत असे गांधीजी म्हणतात. भारतातील स्त्री ही रुढी व अन्याय यामुळे निरीक्षण राहिली असून त्यांच्या निरक्षरतेला पुरुष व त्यांचा आळसही कारणीभूत आहे. महिला साक्षर झाल्या तर त्या घरी मुलांना शिकवू शकतील आणि संपूर्ण कुटुंब साक्षर होईल व संस्कारी कुटुंब बनेल त्यासाठी स्त्री शिक्षणाचा मोठा प्रचार व प्रसार झाला पाहिजे. वैज्ञानिक क्षेत्रात स्त्रियांना ज्ञान दिले पाहिजे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग हा मोलाचा झाला पाहिजे हे महात्मा गांधीजींच्या विचारातून आपणास दिसून येते.

**वर्धा शिक्षण**

महात्मा गांधींनी 1937 मध्ये एक विशेष शैक्षणिक कार्यक्रम आणला त्याला वर्धा शिक्षण योजना म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यामध्ये 5 ते 14 वयोगटातील सर्व मुला मुलींना त्यांच्या संबंधित स्थानिक भाषेत म्हणजे त्यांच्या मातृभाषेत मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळावे असा त्याचा उद्देश होता. याला नई तालीम किंवा नवीन शिक्षण म्हणून

ओळखले जाऊ लागले. याला बुनियादी शिक्षण असेही म्हणू लागले. बुनियादी शिक्षण म्हणजे व्यक्तीतील गुणांचा विकास करून त्याला एक आदर्श नागरिक बनविणे. यामध्ये इंग्रजी भाषेला कोणतेही स्थान नव्हते. आपल्या मातृभाषेतच बालकांचा विकास घडवणे हा वर्धा शिक्षणाचा मुख्य हेतू होता.

**प्रौढ शिक्षण**

विद्यार्थ्यांनी सुट्टीच्या काळात ग्रामीण भागात जाऊन प्रौढ शिक्षणाचे कार्य करावे. ग्रामीण भागातील लोकांना शिक्षणाच्या चौकटीत आणावे. त्यामागची भूमिका विद्यार्थ्यांची असावी असे केल्याने भारतामधील अंधश्रद्धा, निरक्षरता, अज्ञान, व्यवहारिक ज्ञानाची कमतरता, आरोग्य विषयक विचार इत्यादी गोष्टीच्या आधारावर गांधीजी प्रौढ शिक्षणाचा आग्रह धरतात. त्याचबरोबर ते म्हणतात निरक्षरता हा देशातील कलंक आहे. यासाठी प्रौढ व्यक्तींना विविध क्षेत्रातील ज्ञान मिळणे गरजेचे आहे. त्यांना आकडेमोड म्हणजेच हिशोब करता यायला हवा, भौगोलिक परिस्थितीची जाणीव असली पाहिजे, इतिहास त्यांना माहीत झाला पाहिजे, आरोग्यशास्त्राविषयी त्यांना माहिती मिळाली पाहिजे, लिहिणे-वाचणे या गोष्टी त्यांना चांगल्या पद्धतीने जमल्या पाहिजेत यासाठी प्रौढांना ज्ञान मिळणे खूप गरजेचे आहे. स्वराज्याच्या निर्मितीसाठी लोकशिक्षण खूप आवश्यक आहे. असे प्रौढ शिक्षणाविषयी गांधीजींचे मत होते.

**अभ्यासक्रमातील विषय**

शिक्षण क्षेत्राची प्रगती साधण्यासाठी गांधीजींनी व्यायाम, खेळ, व्यवसाय, चित्रकला, संगीत, धार्मिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, ललित कला, कृतीद्वारे शिक्षण, हस्तकला, निसर्गातून शिक्षण, स्वानुभवातून शिक्षण, समन्वयातून शिक्षण, स्वावलंबनातून शिक्षण, अशा विविध संकल्पनेवर त्यांनी प्रभाव टाकला आहे. त्याचबरोबर पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासक्रमात याविषयीचे मुद्दे असले पाहिजेत जेणेकरून विद्यार्थ्यांना आपला सर्वांगीण विकास करता येईल त्याचबरोबर शिक्षणामध्ये उद्योग,व्यापार, तांत्रिक कला, उच्च साहित्य, विविध प्रकारची शास्त्रे अशा वेगवेगळ्या गोष्टींचा समावेश अभ्यासक्रमात असला पाहिजे असे मत गांधीजींचे होते. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर मोठ्या प्रमाणात भर दिला पाहिजे. यातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना अधिक वाव मिळेल.असेही त्यांनी अभ्यासक्रमा विषयी विचार मांडले आहेत.

**निष्कर्ष**

१. महात्मा गांधीजींच्या शिक्षणात शारीरिक श्रमाला खूप महत्व दिल्याचे दिसून येते.
२. महात्मा गांधीजींची शिक्षण प्रणाली ही व्यवसाय केंद्रित असल्याचे दिसून येते.
३. महात्मा गांधीजी यांचे शिक्षणासंबंधीचे विचार हे समाज उपयोगी असल्याचे दिसते.
४. महात्मा गांधीजींच्या शिक्षणाचा उद्देश केवळ पाठ्यपुस्तक वाचणे नसून विविध कलेतून सर्वांगीण विकास साधने होय.
५. गांधीजींचे शिक्षण पद्धती ही भारतीय संस्कृतीला स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविणारी दिसते आहे.
६. गांधीजींचे शिक्षण विषयक विचार हे विद्यार्थी केंद्रीय असून विद्यार्थ्यांची साथ जोपासणारे असल्याचे दिसते.

७. हस्तकलेच्या माध्यमातून शिकण्यावर भर दिला जाऊ शकतो.शिक्षणामुळे स्वावलंबी बनून स्वतःची व देशाची प्रगती साधता येते.

**संदर्भ सूची**


१. असा घडला भारत :- सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेरकर - रोहन प्रकाशन,पुणे

२. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास:- डॉ.अण्णासाहेब गरुड,डॉ.बी.बी.सावंत- कैलास प्रकाशन औरंगाबाद.

३. राम मनोहर लोहिया:- समाजवाद काळा व गोरा

४. आधुनिक भारत:- डॉ.जयसिंगराव पाइर, -अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.

५. शिक्षणाची तत्वे :-सक्षेना एस., सूर्या प्रकाशन, मीरत